आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -दुपारी ३.०० वाजता

२६ एप्रिल २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- राज्यातल्या ८ लोकसभा मतदारसंघात दुपारी १ वाजेपर्यंत सुमारे ३२ टक्के मतदान, राज्यातल्या २०४ उमेदवारांचं भवितव्य आज मतदान यंत्रात बंद होणार

- मतदारांसाठी मतदान केंद्रांवर विविध सोयीसुविधा, अकोल्यात विविध व्यावसायिकांकडून मतदारांना सवलती

- पाचव्या टप्प्यातल्या १३ मतदारसंघांमध्ये अर्ज भरायला आजपासून सुरुवात

**आणि**

- सर्व VVPAT पावत्यांची मोजणी करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातल्या ८ लोकसभा मतदारसंघात सध्या शांततेत मतदान सुरू आहे. दुपारी १ वाजेपर्यंत राज्यात ३१ पूर्णांक ७७ शतांश टक्के मतदान झालं होतं. सर्वाधिक सुमारे ३४ टक्के मतदानाची नोंद परभणीत झाली. सर्वात कमी सुमारे २९ टक्के मतदानाची नोंद बुलडाण्यात झाली. नांदेडमध्ये ३३ टक्के, वर्धा, अकोल्यामध्ये सुमारे ३२ टक्के, अमरावती आणि यवतमाळ-वाशिममध्ये साडे ३१ टक्के, हिंगोलीत साडे ३० टक्के मतदान झालं.

**<><><><><><>**

अकोला, हिंगोली, परभणी, नांदेड, यवतमाळ-वाशिम, अमरावती, वर्धा आणि बुलडाणा या मतदारसंघामधे मिळून २०४ उमेदवार या टप्प्यात नशीब आजमावत

आहेत. यातले सर्वाधिक ३७ अमरावतीमध्ये असून सर्वात कमी १५ अकोल्यात आहेत. अमरावती, हिंगोली आणि परभणीत ३० पेक्षा अधिक उमेदवार रिंगणात आहेत, त्यामुळे याठिकाणी प्रत्येकी ३ बॅलेट युनिट, अकोल्यात १ आणि उर्वरित मतदारसंघात प्रत्येकी २ बॅलेट युनिट वापरात आहेत.

**<><><><><>**

परभणीत २० ठिकाणी मतदान यंत्रात बिघाड झाल्यानं ते बदलण्यात आले.

**हिंगोली** लोकसभा मतदार संघातील ताकळी तालुक्यातील मतदान केंद्रात मॉक पोल दरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रात तांत्रिक समस्या असल्याने, मतदान प्रक्रिया बाधित झाल्याचे वृत्त खाजगी वृत्तवाहिन्यांनी दिले होते. त्यावर जिल्हा निवडणूक प्रशासनाने तातडीनं कार्यवाही करत मतदान प्रक्रीया सुरळीत सुरू केली.

**वर्धा, अकोला** मतदार संघात मतदानयंत्रात बिघाड झाल्यानं मतदान प्रक्रिया थांबल्याचं वृत्त होतं. त्यावर जिल्हा प्रशासनानं तातडीनं कारवाई करत मतदान सुरळीत सुरू केलं.

**<><><><><>**

श्रोते हो, राज्यातल्या आजच्या मतदानाचा आढावा घेणारा विशेष कार्यक्रम ‘मतदानाचा मागोवा’ आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर आज रात्री सव्वा आठ पासून ऐकता येईल.

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमाच्या संध्याकाळी सव्वा ७ वाजता कोल्हापूर आणि हातकंणगले लोकसभा मतदार संघाचा आढावा ऐकता येईल.

**<><><><><>**

मतदानाच्या तयारीसाठी प्रशासनानं सर्वच मतदान केंद्रांवर जय्यत तयारी केली आहे.

**नांदेडमध्ये** गुजराथी हायस्कूलमधल्या महिला कर्मचाऱ्यांद्वारे संचलित मतदान केंद्रावर फूल देऊन कर्मचाऱ्यांनी मतदारांचे स्वागत केले.
यवतमाळमध्ये एका मतदान केंद्रावर दिव्यांग बांधवांनी झाडाचं रोप देऊन मतदारांचं स्वागत केलं.

**हिंगोलीत** दुपारनंतर उन्हाचं प्रमाण वाढत असल्यानं मतदारांनी सकाळीच मतदान केंद्राबाहेर रांगा लावल्या होत्या.

**वाशिम** जिल्ह्यात मतदारांना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून मतदान केंद्राबाहेर सावली राहील, अशी व्यवस्था प्रशासनानं केली आहे. जिल्ह्यातल्या चेतन सेवांकुरच्या दृष्टीबाधित दिव्यांग मतदारांनी ब्रेल चिठ्ठी आणि सहायकाच्या मदतीनं आयुष्यात पहिल्यांदाच मतदान केलं. वाशिम नगरपालिकेच्या घंटागाडीनं मतदारांना मतदानासाठी बाहेर पडण्याचं आवाहन केलं.

**परभणीत** मतदान केंद्रांवर दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी व्हिल चेअरची सुविधा आहे.

**अकोल्यात** एका खानावळीनं मतदान केलेल्यांना ५० टक्के सूट देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. अकोल्यातच एका डॉक्टर मतदान केलेल्यांना उष्माघात प्रतिबंधक औषधं मोफत देत आहेत. शहरातल्या एका सलूनमध्ये मतदान करणाऱ्यांना मोफत कटींग करुन दिली जात आहे. शिक्षणानिमित्त सिंगापूरमध्ये असणाऱ्या एका युवा मतदारानं आज अकोल्यात येऊन मतदान केलं.

**हिंगोली, वाशिम, यवतमाळ, वर्धा, बुलडाण्यामध्ये** अनेक वधु वरांनी लग्नगाठ बांधण्यापूर्वी मतदानाचा हक्क बजावला आणि इतरांनाही मतदानाचं आवाहन केलं. शेगावमध्ये एका नवरदेवानं वऱ्हाडासह मतदान केलं.

या टप्प्यात माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, नांदेडमध्ये उमेदवार वसंत चव्हाण आणि प्रतापराव पाटील-चिखलीकर, वर्ध्यातले उमेदवार रामदास तडस, अमर काळे, यवतमाळ-वाशिममधले उमेदवार संजय देशमुख, अकोल्यातले उमेदवार अभय पाटील, अनुप धोत्रे आणि प्रकाश आंबेडकर, काँग्रेस नेते माणिकराव ठाकरे, बुलडाण्यातले उमेदवार प्रतापराव जाधव आणि रविकांत तुपकर, खासदार हेमंत पाटील, हिंगोलीतले उमेदवार बाबुराव कदम, बी डी चव्हाण आणि नागेश पाटील आष्टीकर, अमरावतीतल्या उमेदवार नवनीत राणा, बळवंत वानखेडे आणि दिनेश बूब, अमित झनक, राजेश टोपे, बबनराव लोणीकर, संतोष बांगर, बच्चू कडू, पंकज भोयर, रवी राणा, यशोमती ठाकूर, मदन येरावार या आमदारांसह मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि अनेक मान्यवरांनी मतदानाचा हक्क बजावला.

**<><><><><><>**

निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात उमेदवारी अर्जांची छाननी सुरू आहे. यामध्ये राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीडसह अकरा मतदारसंघाचा समावेश आहे. या मतदारसंघात एकूण ४४७ उमेदवारांचे ६१८ अर्ज दाखल झाले असल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी अर्ज भरायला आजपासून सुरुवात झाली. या मतदारसंघात इच्छुकांना ३ मे पर्यंत अर्ज भरता येतील. यात राज्यातल्या १३ मतदारसंघांसह देशातल्या एकूण ४९ मतदारसंघांचा समावेश आहे. त्यात मुंबईतले सर्व ६ मतदारसंघ, ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे या लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे.

ईशान्य मुंबईतले भाजपा उमेदवार मिहिर कोटेचा यांनी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत अर्ज भरला.

<><><><><><>

निवडणूक आचारसंहिता भंग प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना क्लीन चिट मिळाली आहे. त्यांनी इंदापूरमध्ये आयोजित एका सभेत निधी वाटपाबाबत वक्तव्य केलं होतं. त्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षानं तक्रार दाखल केली होती.

<><><><><><>

गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्रातील महाविकास आघाडीचे उमेदवार नामदेव किरसान यांच्या विरोधात बदनामीकारक मजकूर प्रकाशित केल्याबद्दल भाजप नेते नामदेव उसेंडी आणि नितीन कोडवते यांच्यावर आचारसंहिताभंगाचा गुन्हा दाखल झाला आहे. किरसान यांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली होती.

<><><><><><>

सर्व 'VVPAT', म्हणजेच वोटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेलमधल्या सर्व चिठ्ठ्यांची मोजणी करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळली. नायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या पिठानं हा निर्णय दिला. निवडणूक आयोगानं दिलेल्या स्पष्टीकरणाच्या आधारावर न्यायालयानं आज हा निर्णय दिला.

मतपत्रिकेद्वारे मतदान करणं, EVM-VVPAT ची संपूर्ण तपासणी करणं आणि मतदारांना VVPAT स्लिप देण्याबाबतच्या याचिका फेटाळण्यात आल्याचं न्यायमूर्ती खन्ना यांनी हा निकाल देताना सांगितलं. मात्र, सर्वोच्च न्यायालयानं निवडणूक आयोगाला दोन निर्देश दिले. त्यानुसार EVM मध्ये चिन्ह लोड

केल्यानंतर, चिन्ह लोडिंग करणारं युनिट सीलबंद करावं आणि कंटेनरमध्ये सुरक्षित करावं. उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींनी या सील वर स्वाक्षरी करावी. तसंच निकाल जाहीर झाल्यानंतर किमान ४५ दिवस ईव्हीएमसह सीलबंद कंटेनर स्टोअर रूममध्ये ठेवावेत. ईव्हीएम प्रमाणेच ते उघडावेत आणि सीलबंद करावेत. दुसऱ्या निर्देशानुसार ५ टक्के ईव्हीएममधले burnt memory semicontroller उमेदवारांच्या मागणीनुसार उत्पादकांच्या अभियंत्यांची तपासावे. अशा प्रकारची विनंती निकाल जाहीर झाल्यावर सात दिवसांच्या आत करणं आवश्यक आहे. अशा विनंतीवर झालेला खर्च उमेदवार उचलेल. ईव्हीएममध्ये छेडछाड झाली असेल, तर तो खर्च उमेदवाराला परत केला जाईल.

**<><><><><>**

अभिनेता सलमान खान याच्या घरावर काही दिवसांपूर्वी गोळीबार करणाऱ्या हल्लेखोरांना बंदुकी आणि इतर साहित्य पुरवणाऱ्या दोन जणांना पोलिसांनी काल पंजाबमध्ये अटक केली.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात एका रानटी हत्तीने हिदूर गावात माजवलेल्या गोंधळात तीन महिला गंभीर जखमी झाल्या. त्यांच्यावर चंद्रपूरच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरु आहेत. काल दुपारी चार वाजेच्या सुमारास कियर इथे शेतात काम करणाऱ्या एका शेतकऱ्यालाही हत्तीनं ठार केलं. तेलंगणातही त्याने दोन बळी घेतले आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रीय चाचणी संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या जेईई मेन्समध्ये वाशिम जिल्ह्यातला नीलकृष्ण गजरे हा तीनशेपैकी तीनशे गुण मिळवून देशात पहिला आला आहे. शेगावच्या बुरुंगले महाविद्यालयात शिकणारा नीलकृष्ण वाशिम जिल्ह्यातल्या बेलखेडमधला असून त्याचे वडिल शेतकरी आहेत.

**होल्ड ... बाईट...**

**<><><><><><>**

मुंबई किनारी रस्ता आणि वांद्रे-वरळी सेतू यांना जोडणाऱ्या गर्डरची आज पहाटे यशस्वीपणे स्थापना करण्यात आली. समुद्रातल्या भरती-ओहोटीचा वापर करून गर्डरच्या मदतीने दोन सागरी मार्ग जोडण्याचा देशातला हा पहिलाच प्रयोग आहे. मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक  भूषण गगराणी यावेळी उपस्थित होते.

**<><><><><><>**

देशाच्या पूर्व आणि दक्षिण द्वीपकल्प प्रदेशात पुढले ४ दिवस तीव्र-ते अती-तीव्र स्वरूपाची उष्णतेची लाट राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. बिहार, झारखंड, आंध्रप्रदेशच्या पूर्व भागात येत्या ३० एप्रिल पर्यंत, तर पश्चिम उत्तर प्रदेश आणि कोकणात येत्या २९ एप्रिल पर्यंत उष्णतेची लाट राहील असा अंदाज आहे.

**//<><><><><><>//**